# नव्वदोत्तरी मराठी कवितेवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव

**डॉ. एकनाथ फुटाणे** मराठी विभागप्रमुख, शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर

---

**प्रस्तावना:**

महात्मा जोतीराव फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव प्रामुख्याने 1960 नंतरच्या मराठी साहित्यावर दिसून येतो. 1960 नंतर मराठी साहित्य विश्वात दलित, ग्रामीण, स्त्रीवादी साहित्यप्रवाह उदयास आले. जरा उशिराने आदिवासी साहित्यप्रवाह देखील मराठी साहित्यात रुजला गेला. उपरोक्त साहित्यप्रवाहातील लेखक, कवींवर प्रामुख्याने महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव आहे.

दलित, ग्रामीण, स्त्रीवादी साहित्याला मुख्य अधिष्ठान हे महात्मा जोतिराव फुले व डॉ. बाबासाहेब यांच्या समता, स्वातंत्र्य, बंधुता व सामाजिक न्याय यांचा आग्रह धरलेल्या तत्वविचारांचे आहे. किंबहुना फुले-आंबेडकरांच्या समताधिष्ठित मूल्य विचाराच्या प्रभावातून लेखक-कवी लेखन करु लागले. तत्कालीन समाजव्यवस्था हीच मूळात शोषण व्यवस्थेतून निर्माण झालेली आहे. कवी-लेखकांना फुले-शाहू-आंबेडकरांच्या समतेच्या तत्वज्ञानातून उमगले होते.

मराठी कवितेत साठोत्तरी वाङ्मयीन प्रवाहापूर्वी लोकशाही मूल्यांना अनुलक्षून झालेले लेखन हे महात्मा फुले यांच्या चळवळींच्या प्रेरणा घेऊन झालेले होते. 1960 नंतर महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारातून, कार्यातून मानवतेचा संदेश पोहचविणारे प्रामुख्याने लेखक लिहू लागले. महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांमुळे नव्या मूल्यव्यवस्थेची, विशुद्ध माणुसकीची, उदारमतवादी लोकशाही मूल्यांची वैचारिक मांडणी होऊ लागली. पुरोगामी विचाराचा प्रभाव जनमानसांवर वाढू लागला. यातूनच समूह भावनेला आविष्कृत करणारी, परिवर्तनाचा ध्यास असणारी, नवसमाज निर्माण करणारी आणि मुख्यत्वे मानवमुक्तीचे तत्वज्ञान सांगणारी कविता जन्माला आली. किंबहुना फुले-आंबेडकर चळवळीची कविता लिहिली जाऊ लागली.

**उद्दिष्टे :**

1. नव्वदोत्तरी मराठी दलित कवितेच्या प्रेरणाचा शोध घेणे.
2. नव्वदोत्तरी मराठी कवितेवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा प्रभाव शोधणे.
3. आंबेडकरी कवितेचा (नव्वदोत्तरी) अभ्यास करणे.
4. नव्वदोत्तरी आंबेडकरवादी कवितेवरील जागतिकीकरणाचा प्रभाव तपासणे.
5. प्रातिनिधिक आंबेडकरवादी कवींच्या कवितेच्या गुण-वैशिष्ट्याचा अभ्यास करणे.

प्रारंभीच्या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराच्या प्रभावातून साहित्य निर्माण झाले नाही. किंबहुना गावकुसाबाहेरचे दलित-वंचित बहुजनांचे वास्तव चित्र कवितेतून आले नाही. या संदर्भात कवी वामन निंबाळकर लिहितात,

"या गावकुसाबाहेरचे चिरडलेले जीवन
विषय झालाच नाही तुमच्या कवितेचा."[1]

प्रस्तुत प्रश्न कवी वामन निंबाळकर यांनी प्रचलित समाजव्यवस्थेतील कवींना निर्भिडपणे विचारला आहे. किंबहुना साहित्याविषयी असलेले हे कटू सत्य मांडलेले आहे. ते आणखीन एका कवितेत म्हणतात,

"तू असा सरसेनापती होता की,
साऱ्याच आघाड्यावर मोर्चे बांधले
तुझ्या वाणी लेखणी आणि करणीच्या तोफगोळ्यांनी
शत्रूचे सारे किल्ले जमीनदोस्त केले.

या कवितेत सरसेनापती आंबेडकर अशी प्रतिमा येथे कवी वापरताना दिसतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वैचारिक आणि सामाजिक क्रांती विज्ञानातून, मूल्याधिष्ठित जीवनाचा, समतेचा, मानवतेचा, बंधुत्वाचा झरा किंबहुना ओघ मुख्यत्वे दलित कवितेतून वाहू लागला. डॉ. आंबेडकरांनी जीवनातील सर्वच क्षेत्रात पुढाकार घेऊन सामान्य, दीन-दलित, दुबळ्यांचा आवाज मुखर केला. त्यांच्या वाणीत, लेखणीत, करणीत ऐक्य होते. जुन्या बुरसटलेल्या, अन्याय, अत्याचारी, मुख्ययत्वे विषमताधिष्ठित समाजरचनेचे किल्ले जमीनदोस्त करण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले.

आंबेडकरी कवितेमध्ये दया पवार, बाबुराव बागूल, नामदेव ढसाळ, केशव मेश्राम, त्र्यंबक सपकाळे, ज. वि. पवार, अर्जुन डांगळे, यशवंत मनोहर आदि पहिल्या पिढीतील कवींची कविता प्राणतत्व म्हणून मार्गदर्शक ठरलेली दिसते. सर्वसाधारणपणे 1960 ते 1985-90 पर्यंत जी आंबेडकरी विचारांची कविता मराठीत लिहिली गेली तिचे विषय हे दारिद्र्य, अस्पृश्यता, भूक, जातियत्तेवरुन होणारा अन्याय, धर्मव्यवस्थेतील अत्यंत वेदनादायी अनुभव, धर्म, देव-देवळे, पुनर्जन्म, दैव, नशीब, पाप-पुण्य, विषमता यांना नकार देणे हे विषय होते. शोषण, सामाजिक, आर्थिक विषमता, वर्णजातिव्यवस्थेविरुद्ध विद्रोह करुन सामाजिक, आर्थिक समता प्रस्थापित होण्यासाठीचे स्वप्न पाहिले. प्रत्येक कवीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याची कृतज्ञता आपल्या कवितेतून व्यक्त केली.

1990 नंतर दलित समाजातून शिक्षण घेतलेली नवी पिढी उदयास आली. ही पिढी दलितत्व नाकारणारी आहे. जातीअंताचा उद्घोष करणारी कविता लिहिली गेली. या काळात हिरा बनसोडे, वसंत शेंडे, दुर्गासिंह चव्हाण, डी. बी. जगतपुरीया, ज्योती लांजेवार, नंदा तायवाडे, सुरेखा भगत, सर्जेराव चव्हाण, मायाताई गेडाम, महेंद्र भवरे, इ. मा. नारनवरे, आशा थोरात, लोकनाथ यशवंत, भुजंग मेश्राम, सुदाम सोनुले, सत्तेश्वर मोरे, शेषराव पिराजी धांडे, प्रभाकर गंभीर, लक्ष्मीकांत तांबोळी, ललित सोनोने, हृदय चक्रधर, अरुण काळे, संजय घरडे, विनायक त्रिभुवन, रवी चापके, मंगेश बनसोड, सुनील यावलीकर, संजय शेजवळ, राजेश नाईक, भास्कर पाटील, अण्णा वैद्य, प्रज्ञा पवार, इ. कवी - कवयित्रींनी आंबेडकरवादी कविता नवोदत्तरी काळात लिहिली.

कविता लिहिणे हा साधारणपणे वैयक्तिक अनुभव मानला जातो. तरीदेखील कवी हा समाजाचा घटक असतो. तो समाजाचे काहीएक देणे लागतो. किंबहुना त्याची एक सामाजिक बांधिलकी असते. यातूनच नवदोत्तरी आंबेडकरवादी कविंनी प्रस्थापितांमधील शोषक घटकांवर हल्ले चढविले. प्रारंभीच्या काळात व्याकुळतेचे व आक्रोशाचे भाव व्यक्त करणारी कविता आव्हानात्मक झाली. ती अधिक चिंतनशील व सयंमी बनत गेली. उपहासात्मक व उपरोधिक भाषाशैलीत अधिक प्रभावी बनत गेली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची निष्ठा अधिक भक्कम झाली. लखमापूकर 'झाड बोलते आहे' डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची निष्ठा व्यक्त करताना लिहितात,

"माझी कविता आहे त्या सूर्यप्रकाशाची
त्याच्या प्रखरतेची, त्याच्या किरणांची
आपणा सर्वांचे जीवन तेजोमय होईल
अशा दैदिप्यमान न मावळणाऱ्या
माझ्या तुमच्या आपल्या सर्वांच्या सूर्याची."[2]

नवदोत्तरी आंबेडकरवादी कवितेमध्ये लोकनाथ यशवंत हे एक महत्त्वाचे कवी आहेत. आता होऊन जाऊ द्या (1989), आणि शेवटी काय झाले (1995), पुन्हा चला करु या (2009), बाकी सर्व ठीक आहे (2014) लोकनाथ यशवंताच्या कवितेचे मुख्य वैशिष्ट्ये म्हणजे संवादात्मकता, कथात्मकता आणि उपरोधिकता ही होत. मुख्यत्वे त्यांची कविता चिंतनशील आहे. लोकनाथ यशवंत आपल्या कवितेतून प्रस्थापितांना तर प्रश्न करतातच पण त्याचबरोबर महत्त्वाच्यावेळी चळवळीतून बाहेर पडून पळ काढणारांना धारेवर धरतात. अंगार लागल्यावरही बारुदचा भडका कसा उडत नाही? का आपणच आपले पुतळे उभारले पावलापावलावर?

स्वकियांची षंढ प्रवृत्ती, आत्मघातकी वृत्ती यावर लोकनाथ यशवंत ताशेरे ओढताना दिसतात. हे त्यांच्या कवितेचे महत्त्वाचे वैशिष्टे आहे.

'अरुण काळे' हे आंबेडकरवादी कवितेतील अत्यंत महत्त्वाचे किंबहुना नवोदत्तरी कवींमधील अग्रणी नाव आहे. रॉकगार्डन (1993), सायरनचे शहर (1997), आणि नंतर आलेले लोक हे त्यांचे कवितासंग्रह होत. अरुण काळे यांची कविता गावकुसाबाहेरील वंचिताच्या वस्तीतून आली. किंबहुना अभावग्रस्ततेतून अवतरली. तदनंतर विद्रोह, नकार नोंदवत समाजातील समानतेचे सूत्र गुंफत राहिली.

कवी अरुण काळे यांनी माणसांमाणसातील भेदभाव, विषमता, जातीयता, दांभिकता यांचा खडपूस समाचार आपल्या कवितून घेतला. भगवान बुद्ध, महात्मा फुले आणि प्रामुख्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे तत्वज्ञान प्रमाणभूत मानून त्यांनी सांगितलेल्या समता, बंधुता, स्वातंत्र्य, सामाजिक न्याय यांचे गाणे गात ती समृद्ध झाली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना उद्देशून कवी अरुण काळे लिहितात,

"तू मदरबोर्ड माझ्या संगणकाचा
आणि मल्टीमिडीया कीबोर्ड
हा संगणक, ही मेमरी अन्
अपडेट प्रोग्रॅमही तूच दिलेला."[3]

'तुझ्या जन्मदिनी' या कवितेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची कृतज्ञता व्यक्त करताना कवी अरुण काळे म्हणतात,

"सूर्याने स्वत:ला
भीमराव म्हणवून घ्यावं
एवढं तुझं मोठेपण
ग्रहताऱ्यांनी उभारावीत
समानतेची सैनिक दलं
आणि
पृथ्वीने रमाईचा पदर घेऊन
ठेवावे तुझ्या उबेत मानवतेला."[4]

अरुण काळे यांच्या कवितेबद्दल राजा ढाले म्हणतात, " अरुण काळे यांची कविता सामाजिक क्रांतीशी आणि पर्यायाने फुले-आंबेडकरांच्या सम्यक क्रांतीशी प्रतिबद्ध असलेली कविता आहे."[5]

महेंद्र भवरे हे आंबेडकरी कविता लिहिणारे महत्त्वाचे नाव. 'चिंताक्रांत मुलुखाचे रुदन' व 'महासत्तेचे पिंडादान' हे त्यांचे दोन कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. जागतिकीकरणाच्या रेट्यात आपण कसे गुलाम होत गेलो याची मांडणी करताना महेंद्र भवरे लिहितात,

"निरर्थाच्या अर्थनीतीवर उतू गेला फेस
आमच्या हाती आले केस
केसावर फुगे पिना मोडकेतोडके भारोभार
भांड्यावर नाव टाकून जात टाकून घ्या ना
बेलदाराच्या भिंती खचून वडाराचे तुटले गाडे
घिसाड्याच्या घिसाडघाईला टाटा भाईनं केला टाटा
टाचारिम्याची सागळ उकलून बारांन आवळला गळा
तितरं लावरं बाटरांची संकराच्या संक्रातीनं केली पारध."[6]

खाऊजा धोरणाने उपेक्षितांच्या जगण्याची साधने संपविली. गावगाड्यातील गरीब बलुतेदारांचे व्यवसाय नष्ट झाले. भांडवलदाराने नफेबाजीच्या हेतूने विविध व्यवसायामध्ये आपली गुंतवणूक केली. सामान्य गरीब माणसांचा व्यवसायावर कुऱ्हाड आल्याने त्याच्यावर उपासमारीची वेळ आली. या संदर्भात महेंद्र भवरे म्हणतात, "भारतीय भूमिच्या आकाशात जात, धर्म, संस्कृती, तत्वज्ञाने, नीतिमत्ता या सर्वच पातळ्यांवर दिवसागणीक जटील समस्या उभ्या आहेत. अशा पार्श्वभूमीवर दलित बहुजनांच्या बाजूने नसणारे जागतिकीकरण, खाजगीकरण, आर्थिक उदारीकरण, आर्थिक धोरणे यामुळे दारिद्र्य रेषेखालील सर्वच समाजाचे अस्तित्व धोक्यात आले आहे."[7] एकूणच आजच्या वर्तमानात होणारी मूल्यांची पडझड, जागतिकीकरणाचे परिणाम कवी महेंद्र भवरे यांनी आपल्या कवितेतून अधोरेखित केले आहेत.

प्रज्ञा दया पवार यांनी 'आटपाट लयीत प्राणांतिक' या काव्यसंग्रहात लिहितात,

कॅलेंडरची पानं फडफडताहेत
मॉलमध्ये परिवर्तित होताहेत गावकुसं
पितृसत्ता जातसत्ता वर्गसत्तेच्या
जिवंत सांगाड्याला
फुटताहेत नवनव्या असाह्य अमानुष पेशी."[8]

जागतिकीकरणामुळे होणारे परिवर्तन येथे कवयित्री अधोरेखित करते. मात्र तिला लोकांची मानसिकता बदलत नाही याची खंत वाटते. समाजातील पितृसत्ता, जातसत्ता, वर्गसत्ता या सत्तांना किंबहुना या अन्यायी व्यवस्थांना जागतिकीकरणाची व्यवस्था बदलवू शकत नाही हे कटू सत्य आहे. प्रज्ञा पवार आंबेडकरवादी स्त्री जाणिवेतून लेखन करणाऱ्या महत्त्वाच्या कवयित्री आहेत.

सुनील अवचार यांनी 'ग्लोबल वर्तमानाच्या कविता', 'मी महासत्तेच्या दारी कटोरा घेऊन उभा राहणार नाही', 'ब्राव्हो!' फॉक्स माइडंस ऑफ कॅपिटॅलिस्टस', 'पाऐम ऑफ दी ऑक्यपाय एव्हरीथिंग', केंद्र हरवत चाललेल्या वर्तुळाचा परीघ या कवितासंग्रहातून आंबेडकरी विचारांची सक्षम कविता लिहिली आहे. त्यांची कविता प्रामुख्याने सामाजिक, आर्थिक न्यायाची भूमिका मांडणारी आहे.

वरील काही नव्वदोत्तरी कवींवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा केलेला विचार हा प्रातिनिधिक स्वरूपाचा आहे. दलित कवितेबरोबरच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा प्रभाव हा एकूण मराठी कवी - लेखकांवर मोठ्या प्रमाणावर आहे. त्यांच्या विचारांचा 'आवाका' इतका मोठा आहे की, तो प्रभाव वैश्विक स्वरुपाचा आहे असेच म्हणावे लागते. हेरंब कुलकर्णी बाबासाहेब 'तुमच्या आयुष्याचा हिशोब मला लागत नाही' या कवितेत लिहितात,

"नुसत्या टाइम मॅनेजमेंटसाठी
तुमचा अभ्यास करायला हवा बाबासाहेब,
आणि माणसांपर्यंत पोहोचविण्यासाठी वापरलेल्या
तुमच्या पद्धती समजून घ्यायला हव्यात
कारण आज सगळी साधने हाताशी असूनही
आम्ही गावकुसाबाहेरच्या
माणसांपासून अनरिचेबल आहोत.... कोसो दूर..."[9]

नव्वदोत्तरी दलित कविता ही जागतिकीकरण, उदारीकरण, खाजगीकरण इत्यादी विषयाबरोबरच विषमतेचे विष समाजात पसरविणाऱ्या जातिभेदाला, दारिद्र्याला नाकारते. डॉ. प्रल्हाद लुलेकर लिहितात, "प्रस्थापित समाजव्यवस्था आणि या व्यवस्थेची मूल्यव्यवस्था नाकारल्याशिवाय सम्यक क्रांती अशक्य आहे. नव्या माणसासाठी नवी समाजव्यवस्था आणि नवी मूल्यव्यवस्था हवी असते."[10] तर प्रा. दत्ता भगत लिहितात, "एक मूल्यसमूह नाकारुन नवा मूल्यसमूह अस्तित्वात यावा म्हणून विद्रोहाचा अवतार असतो. म्हणून मूल्यभाव नसेल तर विद्रोहाला काहीही अर्थ नाही."[11] एकूणच नव्वदोत्तरी मराठी आंबेडकरवादी कविता मूल्याधिष्ठित आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाजाला बुद्धिवादी जीवनदृष्टी दिली आणि त्यातूनच दलित समाजामध्ये एक चिकित्सक वृत्ती निर्माण झाली. चिकित्सक वृत्ती बुद्धिप्रामाण्य, वैज्ञानिक दृष्टिकोन यांचे आविष्करण नव्वदोत्तरी मराठी कवितेत झाले.

थोडक्यात, उपरोक्त कविंपेक्षा इतरही अनेक कवींवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा प्रभाव नव्वदोत्तरी मराठी कवींवर आहे. त्यात अनंत राऊत, राजेंद्र गोणारकर, आदिनाथ इंगोले, शैलेश त्रिभुवन, सुभाष धोत्रे, सागर भजनाळे, प्रतिभा अहिरे इत्यादी. ही यादी आणखीन वाढतच जाईल.

**काही निरीक्षणे / नोंदी :**

1. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे समाधिष्ठित, बुद्धिवादी, विज्ञानवादी, तर्काधिष्ठित विचार हे दलित कवितेचे किंबहुना आंबेडकरवादी कवितेचे प्रेरणास्थान राहिलेले आहे.
2. आंबेडकरवादी कवितेच्या प्रभावामुळे मराठी कवितेला नवा सामाजिक दृष्टिकोन प्राप्त झाला.
3. आंबेडकरवादी साहित्याचे मुख्य प्रयोजन समाज परिवर्तन व सामाजिक बदल निर्माण करणे हे होय.
4. आंबेडकरवादी कविता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मानवी जीवनातील कर्तृत्व प्रेरणादायी ठरलेले आहे.
5. 1990 नंतरच्या आंबेडकरी कवितेतून स्त्रियांचे होणारे अवमूल्यन व वस्तूकरण नाकारले आहे, ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराची निष्पत्ती आहे.
6. नव्वदोत्तरी मराठी कवितेतून मुख्यत्वे दलित कवितेने स्वातंत्र्य, समता व बंधुत्वाचा पुरस्कार हिरारीने केला आहे.
7. नव्वदोत्तरी दलित मराठी कविता अन्यायाविरुद्ध नकार, विद्रोह व चीड व्यक्त करणारी आहे.
8. आंबेडकरवादी कविता एकूण मानवजातीच्या उन्नतीचा विश्वव्यापी विचार मांडते.
9. मराठी कवितेत डॉ. आंबेडकरांना सूर्य, सरसेनापती, समाजाचा नायक, माता, महासंगणक, दिग्विजयी, सारथी अशा प्रतिमा वापरल्या आहेत.

**संदर्भ :**

1. पानतावणे गंगाधर, आंबेडकरी जाणिवांची आत्मप्रत्ययी कविता, गोदा प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, 2010, पृ. 9
2. पानतावणे गंगाधर, आंबेडकरी जाणिवांची आत्मप्रत्ययी कविता, तत्रैव, पृ. 43
3. चांदवडकर तुषार / गोखले चारुता (संपा.), नव्वदोत्तरी मराठी साहित्य आणि समाज, कुसुमाग्रज प्रकाशन, नाशिक, प्रथमावृत्ती, 2016, पृ. 91
4. काळे अरुण, 'रॉक गार्डन', प्रबोधन प्रकाशन, नागपूर, तिसरी आवृत्ती, फेब्रु. 2011, पृ. 45
5. काळे अरुण, 'रॉक गार्डन', (लेख - रॉक गार्डनमधून एक फेरफटका - राजा ढाले), तत्रैव, पृ. 7
6. भवरे महेंद्र, 'महासत्तेचे पीडादान', लोकवाड़मय, मुंबई, 2002, पृ. 50
7. भवरे महेंद्र, 'महासत्तेचे पीडादान', अभिधानंतर, प्रकाशन मुंबई, पहिली आवृत्ती, पृ. 50
8. पवार प्रज्ञा, 'आरपार लयीत प्राणांतिक', लोकवाड़मय गृह प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती, 2009, पृ. 43
9. कुलकर्णी हेरंब, 'अस्वस्थ क्षणाच्या नोंदी', प्रकाशक - Pustakmarket.com, प्रथमावृत्ती, डिसेंबर 2022, पृ. 18
10. लुलेकर प्रल्हाद, साठोत्तरी साहित्यप्रवाह भाग -2, सायन प्रकाशन, प्रथमावृत्ती, 2014, पृ. 82
11. तत्रैव, पृ. 82